# यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक कार्यांचे अध्ययन

**डॉ. मिलींद पंजाबराव तायडे**
**अर्थशास्त्र विभाग**
जवाहरलाल नेहरु कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, वाडी, नागपूर

***गोषवारा***

*यशवंतराव यांनी महाराष्ट्राच्या निर्मिती पासून आर्थिक बाबीकडे महत्वपूर्ण लक्ष केंद्रीत केले. या थोर व्यक्तिचे कार्य सर्वव्यापी आहे. त्यांच्या कार्यावर विविध विचारवंतांनी प्रकाश टाकलेला आहे. मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनातील प्रकाशमान यशामुळे त्यांच्या आर्थिक कार्यावर, विचारावर विपूल असे लिखाण झालेले दिसून आलेले नाही. राजकीय विचार प्रमाणेच यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार महत्वाचे वाटतात. या संशोधन पेपरमध्ये कृषी, उद्योग, आर्थिक विषमता, कर पद्धती आणि चलनवाढ या विषयाला अनुसरुन त्यांनी मौलिक असे जे विचार मांडले आहेत यांचा आढावा घेतला आहे, तसेच आठव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अध्यक्षपदी असताना यशंवतराव चव्हाण यांनी केलेल्या महत्वपूर्ण शिफारशींचा उहापोह केला आहे. तसेच यशवंतराव चव्हाण अर्थमंत्री असतांना त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकातील महत्वपूर्ण तरतूदींचे विश्लेषण यामध्ये करण्यात आले आहे.*

***शब्दसंकेत :*** *वित्त आयोग, उद्योग, आर्थिक विषमता, अंदाजपत्रक, कृषी, कर पद्धती.*

## प्रस्तावना

**१ मे**, १९६० रोजी मराठी भाषिकांचे मुंबई राजधानी असणारे 'महाराष्ट्र राज्य' आणि गुजराती भाषिकांचे 'गुजरात राज्य' या दोन स्वतंत्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी जबाबदारी स्विकारली. त्यांनी महाराष्ट्राच्या निर्मिती पासून आर्थिक बाबीकडे महत्वपूर्ण लक्ष केंद्रीत केले. या थोर व्यक्तिचे कार्य सर्वव्यापी आहे. त्यांच्या कार्यावर विविध विचारवंतानी प्रकाश टाकलेला आहे. मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनातील प्रकाशमान यशामुळे त्यांच्या आर्थिक कार्यावर, विचारावर विपूल असे लिखाण झालेले दिसून आलेले नाही. राजकीय विचार प्रमाणेच यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार महत्वाचे आहेत.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक कार्याचे अध्ययन करणे.
२) यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.

## यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार व कार्य

**अ) शेतीसंबंधी विचार** शेती संबंधीचे विचार मांडत असताना भूमिहीनांचा प्रश्न तसेच शेतीच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याबाबत प्रामुख्याने विचार मांडले आहेत.

### १) जमिन मालकीचा प्रश्न

यशवंतराव चव्हाण यांच्या मते, एखाद्या व्यक्तीकडे जास्तीत जास्त किती जमीन असावी याबाबत काही मर्यादा असावी. तसेच शेती कसणारा शेतीचा मालक असला पाहिजे. त्यामुळे भूमिहीन शेतमजूर आणि श्रीमंत शेतकरी ही वर्ग विषमता कमी होण्यास मदत होईल. थोडक्यात, यशवंतरावांनी सामाजिक समता व सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शेतीचा विचार केलेला दिसून येतो.

### २) भूमिहीनांचा प्रश्न

भारतात शेतीत काम करणाऱ्यामध्ये भूमिहीनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी ज्यांच्याकडे वाजवीपेक्षा जास्त जमीन आहे. त्यांनी आपल्या एकूण जमिनीपैकी काही जमीन भूमिहीनांना द्यावी. यशवंतरावांच्या मते, भारतात ८० टक्के लोकांकडे फारच कमी जमीन आहे. तर २० टक्के लोकांकडे जास्त जमीन आहे मात्र ही जमीनीबाबतची विषमता कमी झाली पाहिजे.

### ३) शेती व्यवसाय म्हणून केली जात नाही

यशवंतरावांच्या मते, भारतीय शेतकरी शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहत नाही तर उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहतो. शेती व्यापारी तत्वावर केली तर अधिकाधिक नफा मिळवण्याचा प्रयत्न शेतकरी करतील त्यामुळे त्यांचा विकास होण्यास होण्यास मदत होईल.थोडक्यात यशवंतरावांनी शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी व्यापारी तत्वावरील शेतीचे समर्थन केल्याचे दिसून येते.

**४) जमिनीच्या विकासाचा प्रश्न**

भारतात फार मोठ्या प्रमाणात जमीन अविकसीत राहिली असल्याने ती अनुत्पादक व लागवड करण्या अयोग्य अगोदर बनली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे व देशाचे नुकसान होते. त्यूळे ही अनुत्पादक व पडीक जमीन लागवडीखाली आणली पाहिजे. त्यासाठी सिंचन सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार झाला पाहिजे. यावरुन यशवंतरावांचा शेती व शेतकरी यांच्या विकासाबाबत व्यापक दृष्टीकोन दिसून येतो.

**५) शेतीच्या आधुनिकीकरणाचा प्रश्न**

शेतीच्या आधुनिकीकरणाबाबत आपण फारच मागे आहोत असे यशवंतरावांचे मत होते. हरित क्रांतीनंतर रासायनिक खते, बी-बियाणे व आधुनिक तंत्रज्ञान शेतीसाठी उपलब्ध झाले असले तरी ते खरेदी करण्याची कुवत शेतकऱ्यामध्ये नसते. तसेच पाणी प्रश्न ही एक ज्वलंत समस्या शेतकऱ्यासमोर उभी आहे, जमिनीचे विभाजन व तुकडीकरण या कारणांमुळे आधुनिक पद्धतीने शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नसल्याचे दिसून येते.

**६) उत्पादन वाढीसाठी पाण्याचा योग्य वापर**

भारतात नद्यांच्या पाण्याचा वापर शेतीसाठी मोठ्या प्रमाणात केला जात नाही. धरणांच्या अभावी नद्यातील पाणी वाया जाते. त्यामुळे नद्यांवर धरणे बांधले पाहिजेत. परंतू या धरण बांधणीमुळे जे लोक विस्थापीत होतील त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे. असे यशवंतरावांचे मत होते.

**७) शेती शिक्षणाचा अभाव**

देशातील लोक जर अज्ञानी असतील तर कोणतेही प्रबोधनकारी विचार ते चटकन स्वीकारत नाहीत. लोकांची हीच मनोवृत्ती शेतीच्या तांत्रीक विकासाच्या आड येते. त्यामुळे शेती व शेतीशी संबंधीत असणारा मनुष्य शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही असे त्यांचे मत होते. त्यासाठी शेकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेतीचे ज्ञान देऊन त्याविषयाचे त्यांचे अज्ञान दूर केले पाहिजे.

**८) शेतीला उद्योगाची जोड द्यावी**

यशवंतरावांच्या मते, शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा आहे. या गाभ्याभोवती लहान लहान उद्योग उभारले गेले पाहिजेत. त्यामुळे खेडे व शहर यातील अंतर कमी होण्यास मदत होईल, तसेच शेतीला लागणारी आवश्यक तंत्रे या कृषी उद्योगात तयार झाली पाहिजेत. उदा. शेतीला लागणारा नांगर शहरात तयार न करता तो खेड्यातच तयार झाला पाहिजे. थोडक्यात, यशवंतराव चव्हाण यांनी शेती समोरील समस्या स्पष्ट करुन त्या सोडविण्यास उपायही सूचविले आहेत. यामागे कृषी विकासासाठी त्यांची आग्रही भूमिका दिसून येते.

**ब) उद्योगासंबंधी विचार**

यशवंतराव चव्हाण यांनी १९६० मध्ये महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेचे उद्घाटन करताना आणि वेगवेगळ्या ठिकाणी त्यांनी केलेल्या भाषणावरुन त्यांचे उद्योगासंबंधीचे पुढील विचार दिसून येतात.

**१) समतोल आर्थिक विकास**

देशाचा विकास म्हणजे कोणत्याही एका भागाचा विकास नसून सर्व प्रदेशांचा सारखाच विकास आवश्यक आहे. म्हणजे देशातील कोणताही भाग इतर भागाच्या तुलनेत मागे राहता कामा नये. म्हणूनच विकासविषयक योजना आखत असताना अविकसित प्रदेशांचा विचार सर्वप्रथम करणे आवश्यक आहे. जेणे करुन अविकसित भागांना विकसित भागांबरोबर आणून देण्याचा समतोल विकास घडवून आणणे शक्य होईल.

**२) ग्रामीण औद्योगिकीकरण**

ग्रामीण भागात शेती पूरक उद्योग सुरु करुन शेती व उद्योगांची सांगड घतली पाहिजे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळविण्यासाठी शहरांकडे धाव घेण्याची गरज भासणार नाही. तसेच ग्रामीण शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करावेत. मात्र यासाठी वीज, पाणी, रस्ते या पायाभूत सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध करुन द्याव्यात.

यशवंतरावांनी त्या काळात मांडलेला विचार आज महाराष्ट्रात मूर्त स्वरुपात आलेला असून तो “महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ” या नावाने ओळखला जातो.

**३) औद्योगिक विकासाचा मास्टर प्लॅन**

देशाचा औद्योगिक विकास समतोल प्रमाणात व्हावा यासाठी ते औद्योगिक विकासाच्या मास्टर प्लॅनची कल्पना मांडतात. या मास्टर प्लॅनमुळे कोणता उद्योग कोणत्या भागात सुरु करता येईल, हे ठरविता येते.

**४) संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना**

अविकसीत भागात नवीन उद्योग उभारण्यास उद्योगपती तयार नसतात. किंवा अशा भागात तांत्रिक अडचणीमुळे उद्योग सुरु करणे शक्य नसते. अशावेळी सरकार आणि खाजगी कारखानदार यांनी एकत्र येऊन नवीन उद्योग सुरु करणे आवश्यक असते. यालाच संयुक्त क्षेत्र म्हणतात. या संयुक्त क्षेत्रामुळे ग्रामीण व अविकसित भागाच्या विकासाला चालना मिळते असे यशवंतरावांचे मत होते. थोडक्यात, अविकसीत भागाच्या विकासावर त्यांचा विशेष भर असलेला दिसून येतो.

**५) स्वयंचलित विकास**

एकूण उत्पन्नामध्ये सातत्याने वाढ घडवून आणण्यासाठी बचतीचे व पैसा गुंतविण्याचे प्रमाण वाढविणे

म्हणजे स्वयंचलित विकास होय. त्यांच्या मते, उत्पदनात वाढ करुन निर्यात वाढविणे, त्यातून परकीय चलनाचा साठा वाढविणे, या परकीय चलनातून उद्योगासाठी आवश्यक असणारी यंत्र-सामग्री खरेदी करणे इत्यादी बाबी स्वयंचलित विकासासाठी आवश्यक असतात. थोडक्यात, उद्योगांच्या स्वयंचलित व सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव वरिल बाबींचा पाठपुरवठा करताना दिसून येतात.

**६) उत्पन्नात नवीन तंत्राचा वापर**

उद्योगाचा जलद गतीने विकास साधण्यासाठी उत्पादनात नव्या तंत्राचा व नव्या उत्पादन पद्धतीचा वापर करावा. तसेच उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक ज्ञान व कौशल्य संपादन करावे म्हणजे उद्योगाचा विकास व विस्तार वेगाने होईल, असे यशवंतराव यांचे मत होते. थोडक्यात, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने औद्योगिक विकास साध्य करण्यावर त्यांनी भर दिलेला दिसून येतो.

**७) व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग**

कामगार हा उत्पादनातील महत्वाचा घटक असतो. त्यामुळे उद्योगाच्या व्यवस्थापनात त्यांना सहभागी करुन घ्यावे. त्यामुळे कामगारांमध्ये उत्पादन क्षमता वाढीस लागेल, औद्योगिक कलह कमी होण्यास मदत होईल. परिणामी उत्पादनातही सातत्याने वाढ घडून येईल असे यशवंतरावांचे मत होते.

**८) कारखानदारांना सहाय्य**

कोणताही नवीन उद्योग सुरु करत असताना उद्योजकासमोर अनेक अडचणी असू शकतात. अशावेळी शासनाकडून आवश्यक ती मदत उद्योजकांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे उद्योजकांना उद्योग सुरु करण्यास विशेष प्रोत्साहन मिळते, असे उद्योजकासंबंधी यशवंतरावांचे मत होते. अशा प्रकारे शासनाने उद्योजकांना आवश्यक ती मदत देण्याचे निश्चित केले तर मागास किंवा अविकसित भागात उद्योग सुरु करण्यास नवीन उद्योजक तयार होतील. परिणामी रोजगाराच्या संधी, उत्पादन व उत्पन्न यात वाढ होऊ शकते. मात्र अशा प्रकारे औद्योगिकीकरण होत असताना त्याचे सामाजिक व आर्थिक परिणाम देखिल अभ्यासणे तेवढेच महत्वाचे ठरते.

**क) करासंबंधी विचार** सहकाराच्या महसूलात वाढ घडवून आणण्यासाठी महसूल प्राप्तीतील विषमता कमी करण्यावर, करांचा आधार वाढविण्यावर आणि करवसुली, प्रशासन यंत्रणा कार्यक्षमक करण्यावर भर देऊन त्यासंदर्भात धोरणे आखली पाहिजेत असे यशवंतरावांना वाटत असे.

**१) चलनवाढीसंबंधी विचार**

चलनवाढ रोखण्यासाठी काळ्या पैशाचे प्रमाण कमी करणे, देशात उत्पादनाचे योग्य वाटप करणे, समाजजागृती करणे या बाबींवर यशवंतरावांनी भर दिलिला दिसून येतो.

**२) आर्थिक विषमतेसंबंधी विचार**

आर्थिक विषमतेसंबंधी विचार मांडत असताना यशवंतरावांनी जागतिक पातळीवरील विषमता विचारात घेतली आहे. उदा. अविकसित देशात लोकसंख्या जास्त असते. मात्र त्यांचे उत्पन्न व सुखसोयी कमी असतात. त्यामुळेच दिवसेंदिवस विकसित व अविकसित देशातील आर्थिक विषमता वाढत जाते. तेव्हा हे अंतर कमी करण्यासाठी काय करता येऊ शकेल याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे असे यशवंतरावांना वाटत असे. आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यासंबंधी अत्यंत मौलिक असे विचार यशवंतरावांनी मांडलेले दिसून येतात.

**वित्त आयोग आणि यशवंतराव चव्हाण**

केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांच्यामध्ये वित्तीय साधन सामग्रीचे वाटप करण्यासंबंधी शिफारशी करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने वित्त आयोगाच्या नेमणुकीची तरतूद केली आहे. राष्ट्रपती दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची नेमणुक करतात. कारण केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांची वित्तीय स्थिती काळाच्या ओघात अनेक कारणांमुळे बदलते. प्रत्येक पातळीवरील सरकारच्या गरजा बदलतात. ही बदलती परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांच्या वित्तीय संबंधातही काही बदल घडवून आणणे आवश्यक ठरते. यादृष्टिने विचार करता वित्त आयोगाची नेमणूक दर पाच वर्षांनी केली जाणे योग्य ठरते. त्यानुसार भारतात पहिला वित्त आयोग १९५१ मध्ये नेमण्यात आला. पहिल्या वित्त आयोगाचे अध्यक्ष के.सी.नियोगी हे होते, तर १९८२ मध्ये नेमण्यात आलेल्या आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष यशवंतराव चव्हाण होते.

यशवंतराव चव्हाण यांनी आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष या नात्याने प्राप्तीकर, मध्यवर्ती उत्पादन कर, मालमत्ता कर इत्यादी करापासून मिळणाऱ्या महसुलाची केंद्र व घटक राज्ये यांच्यामध्ये विभागणी कशी करायची आणि घटक राज्यांना द्यावयाची जी एकूण रक्कम असेल त्या रकमेचा घटक राज्यामध्ये कोणत्या तत्वानुसार वाटप करावयाचे याबाबत मोलाचे योगदान दिले असल्याचे दिसून येते.

**अर्थसंकल्प आणि यशंवतराव चव्हाण**

देशाचा आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक असणारे मुलभूत तत्व परखडपणे मांडणारे आणि

जनसामान्याविषयी ओढ असणारे, उत्कृष्ट संसदपटू व कुशल प्रशासक म्हणून यशंवतराव चव्हाण यांचे नाव लौकिक आहे. देशाच्या अर्थसंकल्पामध्ये यशंवतराव चव्हाण यांचे तत्वे विशेष उल्लेखनीय आहेत. विकासाच्या तरतुदीमध्ये अर्थसंकल्पातील तरतूदी या महत्वाच्या असतात. या तरतूदी विशेषत्वाने आणि नि:संकोचपणे मांडण्याचे कार्य यशवंतरावांनी १९७१-७२ ते १९७४-७५ या सलग चार वर्षाच्या अर्थसंकल्पात केले आहे.

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे विचार अत्यंत मोलाचे ठरले आहेत. भारतीय शेतीक्षेत्र, सहकार, शिक्षण, राजकारण, साहित्य इ. संदर्भात त्यांचे मौलिक विचार आहेत. यशवंतराव चव्हाण यांनी आपले सर्व आयुष्य राजकारणात जरी व्यतीत केले असले तरी एक उत्कृष्ट अर्थतज्ज्ञ म्हणूनही त्यांचे योगदान महत्वपूर्ण ठरते. १९७१-७२ ते १९७४-७५ पर्यंत ते केंद्रिय अर्थमंत्री म्हणून कार्यरत होते. तर १९८२ मध्ये नेमण्यात आलेल्या भारताच्या आठव्या वित आयोगाचे ते अध्यक्ष होते. म्हणजे आर्थिकदृष्ट्या महत्वाची पदे त्यांनी भूषविली होती. यशवंतराव चव्हाण यांचे असे मत होते की, जर भारतातील लोकशाही यशस्वी करायची असेल तर शिक्षण, सहकार, शेती व आरोग्य या चार खात्याचे काम यशस्वी झाले पाहिजे. राज्याचे मुख्यमंत्री झाल्यापासून ते संरक्षणमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारपर्यंत आणि अर्थमंत्री असताना स्वीकारलेल्या धोरणावरुन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या भाषणांवरुन त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट होतात.

**संदर्भसूची :**


१) चव्हाण यशवंतराव (२००६): “युगांतर” कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
२) देसाई आणि भालेराव (१९७६) :“भारतीय अर्थव्यव्स्था”, निराली प्रकाशन, पुणे.
३) बोधनकर सुधिर व अलोणी विवेक (२००३): “सामाजिक संशोधन पद्धती”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
४) जोशी रामभाऊ (१९७६): “यशवंतराव : इतिहासाचे एक पान”, केशरी प्रकाशन, पुणे.
५) कोंडेवार यू. बी. व कोंडेवार स्मिता (२००५): “आर्थिक विचारांचा इतिहास”, शोभाभारती प्रकाशन, अहमदपूर, लातुर.
६) मेंहेंदळे विश्वास (२००७): “यशवंतराव ते विलासराव”, अनुबंध प्रकाशन, पुणे.
७) रायखेलकर ए. आर. (२००५): “आर्थिक विचारांचा इतिहास”, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
८) Suory M.M. (2003) : India Central Government Budgets (1947-48 to 2003-04) New Century Publication, Delhi.


ISSN 2349-638X
www aiirjournal.com